# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१६ सप्टेंबर,२०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# चिमुर पोलीसांची दारूतस्करांविरूध्द कार्यवाही

## दोन आरोपीसह २० लक्षचा मुद्देमाल जप्त

दिनांक १६/०९/२०१९ रोजी पोलीस स्टेशन चिमुर येथील पोलीस पथक पोलीस स्टेशन परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम चिमुर परिसरात अवैध रित्या दारूची वाहतुक करणार आहे. यावरून चिमुर येथील नेरी, पिएचसी चौकात नाकेबंदी लावुन एका संशयीत वाहनास थांबवुन वाहनाची तपसाणी केली असता वाहनामध्ये १५० बॉक्स देशी दारूचा माल किं. १५,००,०००/—रू मिळुन आला. सदर दारूचा माल आणि दारू वाहतुकी करीता वापरलेले वाहन महिंद्रा बोलेरो पिक अप क्र. एमएच ३१ एफसी १८२१ किं. ५,००,०००/—रू. असा एकुण २०,००,०००/—रू चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन चिमुर येथे नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे १)पियुष माणीकराव माणुसमारे, रा. वरोरा, २) जय भरतराव वागदे रा. समुद्रपुर जि. वर्धा यांना अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास चिमुर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही डॉ.श्री. महेश्वर रेडड्ी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर, यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी चिमुर श्री. मारूती इंगवले यांचे नेतृत्वात पोनि. श्री. स्वप्निल धुळे यांचेसह सपोनि. श्री. रविंद्र खैरकर, पोहवा. विलास निमगडे, पोना. किशोर बोढे, पोशि. सचिन गजभिये, विनायक सुरकुंडे, शंकर बोरसरे, कैलास बनकर यांनी पार पाडली.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)

# चंद्रपुर शहर पोलीसांची दारूतस्करांविरूध्द कार्यवाही

## एका वाहनासह १५ लक्ष ९४ हजाराचा मुद्द्ेमाल जप्त

दिनांक १६/०९/२०१९ रोजी पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम आरवट कडुन पठाणपुरा कडे एक चारचाकी वाहन भरधाव वेगाने पळवुन नेत आहे. अशा माहितीवरून चंद्रपुर शहर येथील पोलीस पथकाने संशयावरून ईरई नदीच्या पुलाजवळ एका टोयोटा क्वालीस वाहनास ताब्यात घेतले. सदर वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये ७० बॉक्स देशी दारूचा माल किं. १,७०,०००/—रू, १०बॉक्स मॅकडोनल विदेशी दारू किं. १,४४,०००/—रू, दारू वाहतुकीकरीता वापरलेले वाहन टोयोटा क्वालीस क्र. एम एच ३१ सीएम २२०३ किं. ७,५०,०००/—रू असा एकुण १५,९४,०००/—रू चा मुद्द्ेमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही डॉ.श्री. महेश्वर रेडड्ी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर, यांचे मार्गदर्शनात पोनि. श्री. बहादुरे, यांचे नेतृत्वात परिपोउपनि. चालुरकर, पोशि. शिवाजी गोरे, पोशि. झिलपे यांनी पार पाडली.

---